मुंबई विद्यापीठ
विद्यार्थी कल्याण विभाग
क.वि.क/ /२०१५

डॉ. मृदुल निळे
प्र.संचालक

विद्यापीठ विद्यार्थी भवन
'बी' रोड, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०

**परिपत्रक :**

**विषय :** दि.२१ जून 'आंतरराष्ट्रीय योगा' दिवस साजरा करण्याबाबत.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकीय आणि अशासकीय, अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांचे प्राचार्य/संचालक व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थांचे अध्यक्ष/सचिव यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे मार्फत दि.२१ जून आंतरराष्ट्रीय योगा दिवस राज्यातील विद्यापीठे व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व महाविद्यालये व शैक्षणिक संस्थामध्ये साजरा करण्याच्या दृष्टीने सूचना केलेल्या आहेत.

तसेच उपरोक्त विषयावरील सचिव, मा.राज्यपाल कार्यालय, राजभवन, मुंबई, यांचे दि.२७/०३/१५ चे पत्र व त्यासोबतचे श्री.सुबोध तिवारी, सहसंचालक, ईश्वरदास चुनीलाल योगी हेल्थ सेंटर, कैवल्यधाम, यांच्या पत्राची प्रत जोडली आहे.

त्यानुसार आपणास विनंती करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार योग्य ती पुढील कार्यवाही आपल्या स्तरावर करण्यात यावी, व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सदर कार्यालयास तात्काळ सादर करावा.

प्रत संलग्न : संकीर्ण २०१५/प्र.क.१८७/विशि-३, दिनांक १५ एप्रिल, २०१५.

(डॉ. मृदुल निळे)
प्र.संचालक, विद्यार्थी कल्याण विभाग

दिनांक : १९ सप्टेंबर, २०१४.

प्रति,

विद्यापीठाशी संलंग्नित सर्व अशासकीय आणि शासकीय अनुदानित व विनाअनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन आणि स्थापत्यशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थांचे अध्यक्ष/सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहितीसाठी रवाना :

श्री.पा.म.ताकटे, उप सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

*****************